ग्रामिण पाणी पुरवठा कार्यक्रम

ग्राम आरोग्य,पोषण,पाणी पुरवठा व
स्वच्छता समितीची पुनर्रचना
रद्द करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१९९/पापु-०७

मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ ,दि. १५ ऑक्टोबर,२०१०

वाचा- १) शासन निर्णय,पा.पु.व.स्व.वि.क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.८२/पापु-०७,दि.१२ ऑगस्ट, २००९

२) शासन निर्णय,पा.पु.व स्व.वि.क्र ग्रापाधो-११०९/प्र.क्र.८२/पापु-०७, दि.१८ नोव्हेंबर, २००९

प्रस्तावना :

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये ग्राम आरोग्य,पोषण,पर्यावरण,पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या संरचनेत बदल करुन या समितीच्या पदसिध्द अध्यक्षपदी ग्रामपंचायतीचे सरपंच व पदसिद्ध सचिवपदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय घेण्यात आला आहे. संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये हा बदल दि.१२ ऑगस्ट,२००९ पासून अंमलात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

२. उपरोक्त दोन्ही शासन निर्णयांविरोधात उच्च न्यायालय,मुंबई तसेच उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपुर खंडपीठात विविध रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र.३७५५/२०१० व इतर ७ याचिका यावर मा.उच्च न्यायालयाने दि.२४ ऑगस्ट,२०१० रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे-

"Thus ,the impugned resolution is contrary to law being violative of Section 49 of the Bombay Village Panchayat Act,1958 and is thus ,liable to be struck down and is accordingly quashed and set aside. The impugned action of the respondent /Zilla Parishad calling upon the Presidents and the Secretaries of the Village Development Committees appointed by the Gram Sabhas to hand over charge to the Sarpancha and the Gram Sevaks is also quashed and set aside."

३. मा.उच्च न्यायालयाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय रद्द केलेला असल्याने, संदर्भाधीन दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यांच्या उपरोक्त निर्णयास अनुसरुन, संदर्भ क्र.१ व २ येथील शासन निर्णय या शासन निर्णयान्वये तात्काळ रद्द करण्यात येत आहेत. संदर्भाधिन दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यात येत असल्यामुळे संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेली ग्राम आरोग्य,पोषण,पर्यावरण,पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचनाच यापुढे कायम राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१०१०१५१४०८१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
सर्व अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुख्य अभियंता,भारत निर्माण कक्ष,नवी मुंबई
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०५